




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३०० ●शनिवार,दि.३१ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# राज्याला पहिली महिला उपमुख्यमंत्री मिळणार



## सुनेत्रा पवार आज घेणार शपथ!

**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. अजित पवार यांच्यानंतर आता राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार विराजमान होण्याची शक्यता असून, तशी तयारी सुरु झाली आहे. आज सकाळी ११ वाजता राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांची मुंबईत महत्त्वाची बैठक होणार आहे, त्यानंतर सायंकाळी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांनी या संदर्भात सुनेत्रा पवार यांच्यासोबत चर्चा केली आहे, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदासाठी होकार दिला आहे. त्या आता उद्या सायंकाळी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाणार आहे. त्यानंतर लगेचच सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पार पडण्याची शक्यता आहे. छगन भुजबळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांनी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी पक्षाच्या वतीने सूनेत्रा पवार यांची विधीमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाणार असल्याची माहिती देण्यात आल्याचं समजत आहे.

याबाबत राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ ▶▶ उर्वरित पान २ वर

## २८ जानेवारीला अपघात; मात्र विकिपीडियावर २७ जानेवारीलाच अजित पवारांच्या मृत्यूची अपडेट, सत्य काय?

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी २०२५ रोजी विमान अपघातात निधन झालं. त्यांच्या अकाली एग्झिटमुळे महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे राजकारणातील दिलदार माणूस गमावली खंत व्यक्त केली जात आहे. अजित पवार बारामतीच्या विकासासाठी खूप झटले, शेवटी त्याच मातीत त्यांचा दुर्दैवी शेवट झाला. त्यांच्या निधनानंतर अजित पवारांच्या अपघाताबद्दल अनेक चुकीच्या गोष्टी सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात होण्याच्या २१ तास आधीच विकिपीडियाने अजित पवार यांच्या पेजवर त्यांच्या मृत्यूची तारीख अपडेट केली होती. त्यामुळे, ही दुर्घटना घडवून आणल्याचा संशय निर्माण होतोय, असे दावे सोशल मीडियावर केले जात आहेत. दरम्यान याबाबत एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. DGIPR ने यासंदर्भातील माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार, अशा आशयाचे सोशल मीडियावर व्हायरल झालेले दावे खोटे आहेत. विकिपीडिया Coordinated




▶▶ उर्वरित पान २ वर

## परळीत लॉज मधे चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर छापा

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष(AHTU) व पोलीस ठाणे परळी ग्रामीण ची संयुक्त कारवाई; दोन पिडीत महिलांची सुटका

**बीड । प्रतिनिधी**

याविषयी सविस्तर बातमी अशी की, अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव व परळी ग्रामीणचे सहायक पोलीस निरीक्षक सदानंद मेंडके यांना दिनांक २९/०१/२०२६ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे परळी ग्रामीण हद्दीत साई लॉज टोकवाडी, परळी बीड रोड येथे बाहेर जिल्ह्यातून महिलांना बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक मझहरअली सय्यद प्रभारी पोलीस ठाणे परळी ग्रामीण यांना –क्ढण टीम सोबत सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून पोस्टे परळी ग्रामीण चे झख मझहरअली सय्यद, –झख सदानंद मेंडके स्टाफसह व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख झडख पल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण स्टाफसह ▶▶ उर्वरित पान २ वर




## बारामती विमान अपघातात पिंकी माळींचा मृत्यू: कुटुंबाला भयंकर अनुभव, पतीकडून संताप व्यक्त



**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानं महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. अजित पवार यांच्या पार्थिवावर काल बारामतीत अंत्यसंस्कार झाले. त्यावेळी मोठा जनसागर लोटला होता. बारामतीकरांनी साश्रू नयनांनी अजित पवार यांना अखेरचा निरोप दिला. ▶▶ उर्वरित पान २ वर

## अजित दादा या शतकातले जननायक : अमरसिंह पंडित

### गेवराई येथे शोकाकुल वातावरणात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

अजितदादा पवार हे सामान्य माणसाचे नशीब बदलणारे नेते होते, सगळे व्यवस्थित होत असताना त्यांचे जाणे आम्हा सर्वांना उध्वस्थ करणारे आहे. अजितदादा शेवटच्या घटकाची नोंद करणारे नेते होते, त्यांचे असे अकाली जाणे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. दादांना कुणीही विसरणार नाही. अजितदादा हे या शतकातले जननायक होते अशा भावना माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भावनिक होऊन व्यक्त केल्या, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक दु:खद निधनाच्या निमित्ताने गेवराई येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सर्पक्षीय नेते उपस्थित होते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक दु:खद निधनाच्या निमित्ताने गेवराई येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ▶▶ उर्वरित पान २ वर




## लोकभवन येथे हुतात्म्यांना आदरांजली




**मुंबई । प्रतिनिधी**

महात्मा गांधी स्मृती दिन तसेच हुतात्मा दिनानिमित्त महाराष्ट्र लोकभवन मुंबई येथे दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. राज्यपालांचे सहसचिव एस राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांसह लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी व पोलीस अधिकारी आणि अंमलदार तसेच सार्वजनिक बांधकाम खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांनी दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांचे स्मरण केले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी दरवर्षी ३० जानेवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने दादांना श्रद्धांजली

### दादा केवळ नेते नव्हे तर लाखो कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान होते: आ. संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बीड जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने राष्ट्रवादी भवन, बीड येथे शुक्रवारी (दि.३०) रोजी महाराष्ट्राचे लाडके दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. दादा हे केवळ नेते नव्हते, तर हजारो कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान होते. राज्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर



### आ. संदीप क्षीरसागर यांना अश्रू अनावर

**राष्ट्रवादी भवन येथे आयोजित अजितदादांच्या श्रद्धांजली सभेत मनोगतासाठी उभे राहातच अजित दादांबद्दल बोलताना आ. संदीप क्षीरसागर यांना गहिवरून आले होते. त्यांचा कंठ दाटून आला होता आणि अश्रू अनावर झाले होते.**

## विमान अपघात झाला तेव्हा अजित पवारांच्या आई टीव्ही पाहत होत्या; कर्मचाऱ्यांनी केबल कापली



**बारामती । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथील फार्महाऊसचे व्यवस्थापक संपत धायगुडे यांनी खुलासा केला आहे की अपघाताच्या वेळी पवार यांच्या आई आशा टीव्ही पाहत होत्या. त्यांनी त्यांना विचारले, दादा (अजित पवार) यांचा अपघात झाला का ?अजित पवार यांच्या आईला त्यांच्या मुलाच्या मृत्यूची बातमी कळू नये म्हणून, कर्मचाऱ्यांनी ताबडतोब फार्महाऊस ▶ उर्वरित पान २ वर

## केजचा माजी सरपंच व व्यापारी तामिळनाडूत बनावट नोटा खपवताच पकडला; साडेआठ लाखाच्या नोटा जप्त

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील एका माजी सरपंचासह एका कृषी पंप व्यापाऱ्याने तामिळनाडू राज्यात बनावट नोटा चालवण्याचा बेकायदेशीर प्रयत्न केला. तामिळनाडू पोलिसांनी दोघांनाही अटक केली असून साडेआठ लाख रुपयाच्या बनावट नोटा जप्त केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली जिल्ह्यातील थुवाकुडी पोलिसांनी ही कारवाई केली आहे.या प्रकरणाचा तपास तामिळनाडूच्या गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात आला आहे. केज येथील माजी सरपंच रमेश बाबुराव भांगे आणि मूळचा राजस्थानचा असलेला व्यापारी नारायण राम पटेल हे दोघे त्यांच्या खाजगी कार क्र.एम.एच ४४ झेड २३८३ ने तामिळनाडूत फिरायला गेले होते. बुधवारी इंधन भरताना त्यांनी एका पेट्रोल पंपावर २०० रुपयांच्या काही नोटा दिल्या. तेथून ते निघूनही गेले मात्र कर्मचाऱ्याला नोटांचा स्पर्श आणि कागदावरून संशय आला. त्याने तातडीने याची माहिती पोलिसांना दिली आणि पोलिसांनी मंजाथिदल चेक पोस्टवर सापळा रचून ही कार अडवली. कार अडवल्यानंतर पोलिसांनी कारची झडती घेतली असता कारमध्ये २०० रुपयांच्या बनावट नोटांचे तब्बल ४१ बंडल दडवून ठेवलेले आढळले. कारवाईत सापडलेल्या ८ लाख ३७ हजार ८०० रुपयांच्या नोटा या बनावट असल्याचे समोर आले. तपासादरम्यान या दोघांनी मदुराई, पुदुक्कोट्टई आणि तंजावर भागात यापूर्वीच अनेक नोटा चलनात आणल्याची कबुली दिली आहे. ▶ उर्वरित पान २ वर






# 'गणेशोत्सव - आत्मनिर्भरतेचे प्रतीक' चित्ररथाला देशात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान

प्रजासत्ताक दिन २०२६ च्या निमित्ताने कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या संस्कृतीचे आणि परंपरेचे दिमाखदार दर्शन घडवणाऱ्या 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या चित्ररथाला केंद्र सरकारचा प्रथम क्रमांकाचा मानाचा पुरस्कार केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय शेठ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतून साकारलेल्या या चित्ररथाने आपल्या कल्पक सादरीकरणाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. नवी दिल्लीतील 'राष्ट्रीय रंगशाळा कॅम्प' मध्ये संरक्षण मंत्रालयाच्या वतीने आयोजित विशेष समारंभात राज्याच्या वतीने सांस्कृतिक कार्य विभागाचे सहायक संचालक श्रीराम पांडे, कार्यक्रमाधिकारी निलेश धुमाळ आणि चित्ररथ साकारणारे मुख्य कलाकार तुषार प्रधान, रोशन इंगोले, कृष्णा सालवटकर, श्रीपाद भोंगाडे, चंद्रकांत पाटील व पंकज इंगळे यांनी हा करंडक आणि सन्मानपत्र स्वीकारले. यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात देशभरातील १७ राज्ये आणि



१३ केंद्र सरकारच्या विभागांचे असे एकूण ३० चित्ररथ सहभागी झाले होते. यामध्ये 'वंदे मातरम्' आणि 'आत्मनिर्भर भारत' ही मुख्य संकल्पना (थीम) ठेवण्यात आली होती. या चुरशीच्या स्पर्धेत महाराष्ट्राने आपल्या कल्पक सादरीकरणाने तज्ज्ञ समिती आणि लोकपसंती अशा दोन्ही स्तरांवर बाजी मारली. या स्पर्धेत जम्मू-काश्मीरच्या चित्ररथाला द्वितीय, तर केरळच्या चित्ररथाला तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. सादरीकरणातील नावीन्य, सामाजिक संदेश आणि दृश्यात्मक आकर्षण या सर्व निकषांवर महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट ठरला आहे. या विजयात सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. चित्ररथाची मूळ संकल्पना आणि संचलनादरम्यान सादर करण्यात आलेले श्री गणेशाचे गाणे विभीषण चवरे यांनी स्वत: तयार केले होते. त्यांच्या कल्पकतेतून उतरलेले हे गीत आणि चित्ररथाची मांडणी यामुळे महाराष्ट्राच्या सादरीकरणाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.

महाराष्ट्राच्या चित्ररथाचा विषय केवळ धार्मिक नसून तो आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणावर आधारित होता. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवातून झालेली समाजजागृती, अष्टविनायकांच्या विलोभनीय प्रतिकृती आणि शाडूच्या मातीपासून तयार होणाऱ्या पर्यावरणपूरक मूर्तींच्या माध्यमातून निर्माण होणारी नवी अर्थव्यवस्था या चित्ररथात प्रभावीपणे दाखवण्यात आली होती. विशेषत: गणेशोत्सवामुळे मूर्तिकार, सजावटकार आणि ढोल-ताशा पथकांतील कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून साध्य होणारी 'आत्मनिर्भरता' हा संदेश केंद्रस्थानी ठेवण्यात आला होता. चित्ररथासोबत सहभागी झालेल्या लेझीम पथक आणि ढोल-ताशांच्या निनादाने संपूर्ण कर्तव्यपथ दणाणून सोडला होता, ज्याची दखल संपूर्ण देशाने घेतली.

◆ पान ४ वरून पुढे...

## सर्वांना बरोबर...

यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आम्ही चौघेही नेते स्व. अजित दादांसोबत काम केले आहे. इतका कामाचा माणूस माझ्या राजकीय जीवनात मी पाहिला नाही. त्यांच्या जाण्याने आपला जिल्हा दुर्दैवी ठरला आहे. त्यांच्या सोबत काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. यावेळी पत्रकारांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांनी श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले की, सन २००१ साली आमदार सुरेश धस यांच्यामुळे मंत्रालयात स्व. अजित दादांची भेट झाली. त्यानंतर एक वर्षाने बारामतीला गेलो असता त्यांनी मला पाहताच हे आष्टीहून आले आहेत असे म्हणत ओळखले. लोकांशी असलेला त्यांचा जिव्हाळा अशा अनेक आठवणींमधून दिसून येतो. या कार्यक्रमात माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश शिंदे, माजी जिल्हा परिषद शिक्षण सभापती नियामत बेग, महाराष्ट्र सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे, व्यापारी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष संजय मेहेर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सुभाष राऊत, वकील संघातर्फे ॲड. रत्नदीप निकाळजे यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काकासाहेब शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड बाजार...

दिली गेली आहेत. एवढेच नव्हे तर बोगस कामे दाखवून बिले उचलण्याचे प्रकार सुरु आहेत. बाजार समितीत करोडोंची अफरातफर होत असतांनाही याकडे कोणीच लक्ष देत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. बीड येथील कृषि उत्पन्न बाजार समितीचा कारभार अक्षरशः ढेपाळला आहे. जिनींगसह इतर कोणत्याच बाबींकडे लक्ष दिले जात नाही. गेल्या दोन वर्षापासून बाजार समिती अंतर्गत असलेल्या जिनींगवर बाजार समितीचा एकही कर्मचारी नाही. जिनींगवाले सांगतील तेच अंतीम मानले जात आहे. कर्मचाऱ्याच्या नावावरचे पैसे उचलून अर्धे तुम्ही अर्धे आम्ही असा गोलमाल सुरु आहे. एकीकडे कर्मचाऱ्यांच्या पगारी तीन-चार महिन्यापासून रखडल्या आहेत. जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांच्यासाठीही पैसा उपलब्ध केला जात नाही. मात्र भाड्यापोटी आलेल्या कोट्यावधी रुपयातून अक्षरश: उधळपट्टी केली जात असून काही संचालकांना खुश करुन हा सर्व खटाटोप सुरु आहे. त्यामुळे नेमकं बोलायचं कोणी ? असाप्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. सातव्या वेतन आयोगाचे पैसे काढण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून याच बाजार समितीने ३०% रक्कम वसुल केली असल्याची चर्चा आहे. आता ही रक्कम नेमकी

◆ पान ४ वरून पुढे...

## जय भवानी...

जाण्याने महाराष्ट्र व बीड जिल्ह्याची कधी ही भरून न निघणारी हानी झाली आहे.त्यांच्या सारखा विकासाचा वादा देणाऱ्या एका कर्तबगार नेत्याला आज महाराष्ट्र कायमचा मुकला आहे.महाराष्ट्राच्या मातीचा खेळ कबड्डी खेळात केलेले काम सांगुन सर्वच क्षेत्रात त्यांचे योगदान मोठे होते.अशा शब्दात त्यांनी शोक व्यक्त करून.त्यांच्या आतम्याला शांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली.दिवसभर महाविद्यालयाला सुट्टी देण्यात आली.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्य विद्यार्थ्यांची उटस्थिती होती.

## वाराणसीतील मणिकर्णिका...

औदुंबर नाईकवाडे, अनंतकाका मुळे, गणपत घोलप, बाळकृष्ण थोरात, कृष्णा पितळे,अमोल पितळे,संदिप मुळे,शहादेव धलपे, रामचंद्र मुळे, रामचंद्र गिरे,हिरामण मुळे, विशाल तागड, ऋषिकेश तागड, गणेश तागड, दत्ता गिरे,बंकट लगास, सुनिल मुळे, हनुमान वैद्य, प्रकाश मुळे, सुखदेव वाणी, दादाराव येडे,बबन गोंडे,दशरथ दाभाडे, दत्ता मुळे, जयदेव गिरे, अशोक तागड,बंडु ढगारे, कल्याण मुळे, अमोल गिरे, सचिन गिरे,बबन गिरे, अर्जुन पितळे, चक्रधर गिरे, महादेव मुळे,सुदाम मुळे,राजेभाऊ गिरे,बाळु सोनावणे आदी सहभागी होते. निवेदनाद्वारे ठाम मागण्या- या आंदोलनादरम्यान जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान भारत सरकार, राज्यपाल तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात – संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकारी व संबंधित एजन्सींवर कठोर कारवाई करावी, तोडफोडीत नुकसान झालेल्या मूर्ती ढिगाऱ्यातून तात्काळ बाहेर काढून अहिल्यादेवी होळकर चॅरिटीज ट्रस्टकडे सुपूर्द कराव्यात, ट्रस्टच्या समन्वयाने मूर्तींची पुनर्स्थापना करण्यात यावी, अशा ठाम मागण्या करण्यात आल्या. शांततेत पण ठाम आंदोलन- या रास्ता रोको आंदोलनात विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, भाविक नागरिक तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या वारशाबाबत आस्था असलेले नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हे आंदोलन पूर्णतः शांततेच्या मार्गाने पार पडले. ऐतिहासिक वारशावर घाला- सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या या ऐतिहासिक घाटाचे स्मशानघाट विकास प्रकल्पांतर्गत नुकसान झाल्यानंतर काशीपासून इंदूरपर्यंतच नव्हे तर संपूर्ण देशभर संतापाची लाट उसळली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी काशीच्या ८४ घाटांपैकी मणिकर्णिका घाटाचे बांधकाम सन १७७१ मध्ये केले होते. या घाटाशी संबंधित अनेक ऐतिहासिक मूर्ती व धार्मिक प्रतीके या तोडफोडीत खराब झाली असून काही मूर्ती ढिगाऱ्याखाली

◆ पान ४ वरून पुढे...

दबल्या, तर काही उघड्यावर पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या आहेत. ज्या ठिकाणी ही तोडफोड झाली, तेथे अहिल्यादेवी होळकर यांच्या शिवआराधनेशी संबंधित प्रतिमा स्थापित होत्या. मणिकर्णिका घाटाची देखभाल अहिल्यादेवी होळकर चॅरिटीज ट्रस्ट कडून केली जाते. ट्रस्टचे अध्यक्ष यशवंतराव होळकर यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता करण्यात आलेल्या या कारवाईवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. दरम्यान, इंदूरच्या होळकर राजघराण्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी व उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची व नुकसान झालेल्या मूर्तींची पुनर्स्थापना करण्याची मागणी केली आहे. मणिकर्णिका घाटावर अंत्यसंस्कार केल्यास मोक्षप्राप्ती होते, अशी धार्मिक मान्यता असून यात्रेकरूंसाठी धर्मशाळा, मंदिरे, अन्नछत्रे व स्नानगृहे उभारून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी काशीच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घातली होती.

## आज मूकनायक...

आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त सीईओ पी व्ही बनसोडे लाभणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून सर्वश्री संपादक गंमत भाऊ भंडारी, दिलीप खिस्ती, सुनील क्षीरसागर, शेख तय्यब,उत्तम हजारे, वैभव स्वामी, संदीप बेदरे,तसेच प्राचार्य डी जी निकाळजे, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, संदीप उपरे जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, सीए बी बी जाधव, पत्रकार दत्ता देशमुख, गणेश सावंत, संजय मालानी,दिनेश लिंबेकर,किशोर कागदे,वेंकटेश वैष्णव, अशोक वाणी, सुनील डोंगरे, अमोल मुळे, सावंत सर, बालाजी जगतकर, दीपक काळकुटे, मिलिंद आदमाने,साहस आदोडे,दीपक थोरात, राजू जोगदंड, दिलीप तरकसे, प्रदीप कांबळे, ससाने, शिरीष शिंदे,नितीन मुजमुले, संदीप मोराळे, गणेश कानडे, संपादक शेख आयेशा यांना निमंत्रित करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांमध्येच पत्रकार संघाच्या वतीने महामानव अभिवादन ग्रुप आणि महामानव सार्वजनिक वाचनालयाचे प्रणेते, सेवानिवृत्त प्रयोगशाळा तज्ञ, जनसेवक डी जी वानखेडे यांचे सामाजिक कार्य लक्षात घेऊन त्यांना मूकनायक २०२६ या पुरस्काराने उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या पूर्वी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री सर्वांच्या कामाचा माणूस म्हणजेच लोकप्रिय अजितदादा पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राचे न भरून निघणारे नुकसान झाले आहे.त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी याकरता भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.

या मूकनायक दिन समारंभास आणि अभिवादन कार्यक्रमास संवेदनशील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## संस्कारची शैक्षणिक...

आश्चर्यचकितपणे बघतच राहिले. हर हर महादेव ही गर्जना करून अतिशय श्रद्धेने बाल चिमुकल्यांनी घृष्णेश्वराचे दर्शन घेतले. या सहली दरम्यान विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी, सकाळचा- सायंकाळचा चहा, नाष्टा ,रात्रीचे जेवण यांची उत्तम सोय करण्यात आली होती. ही सहल यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी सर्व आदरणीय संचालक मंडळ व सन्माननीय मुख्याध्यापक श्रीमती शोभाताई कुलकर्णी व सन्माननीय विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर यांचे मार्गदर्शन लाभले व सर्व सहकारी शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांची सर्वतोपरी काळजी घेऊन ही सहल यशस्वीरित्या संपन्न केली. या सहलीवर आधारित निबंध लेखनाचे आयोजन केले जाणार असून या स्पर्धेत उत्कृष्ट निबंध लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सहल विभागातर्फे बक्षीसही देण्याचे नियोजित केलेले आहे.

## आदित्य पॉलीटेक्निकच्या...

अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे हे यश वैयक्तिक असले तरी, विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी कटिबद्ध असलेल्या आदित्य पॉलीटेक्निकच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाची ही ठळक पावती असल्याची भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.विद्यार्थ्यांचा सत्कार करताना विभागप्रमुख प्रा गडदे आर.ए., प्रा तांबे एल.टी., प्रा निमगावकर एस.एस., विभागप्रमुख प्रा राऊत डी.एस., प्रा खालापुरीकर जी.एम. उपस्थित होते.योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीचे यशस्वी फळ – आसाराम राख: आदित्य पॉलीटेक्निकने अनिकेतला शिक्षणकाळात वेळोवेळी योग्य मार्गदर्शन दिले. अभ्यासासोबतच शिस्त, सातत्य आणि करिअरविषयक दिशा मिळाल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला. अनिकेतचा कष्टाळूपणा, चिकाटी आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यांची सांगड घातल्यामुळेच आज त्याला भारतीय नौदलात 'सेलर (SSR)' पदावर निवड मिळू शकली, अशी भावना वडील आसाराम राख यांनी व्यक्त केली. करिअर घडविण्याचा प्रामाणिक दृष्टिकोन फलदायी – भागवत औटे आदित्य पॉलीटेक्निकचा विद्यार्थ्यांच्या करिअरला योग्य वळण देण्याचा उद्देश अत्यंत प्रामाणिक आणि सकारात्मक आहे. केवळ शिक्षण देणे नव्हे, तर भविष्याच्या संधी ओळखून त्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे हे महाविद्यालयाचे वैशिष्ट्य आहे. याच मार्गदर्शनाचा परिणाम म्हणून माझ्या मुलाची भारतीय सीमा सुरक्षा दलात निवड झाली, असे समाधान व अभिमानाने वडील भागवत औटे यांनी सांगितले.

◆ पान ९ वरून पुढे...

## राज्याला पहिली...

यांनी म्हटले आहे की दादा गेले आणि ज्या पद्धतीने ते गेले त्यामुळे सर्वांची झोप उडाल्यासारखं झालं आहे. आता कोणाकडे तरी सर्व जबाबदारी देऊन पक्ष किंवा सरकार चालवावं तर लागणार आहे. विधीमंडळाच्या सदस्यांची उद्या बैठक बोलावली आहे. त्याच्यात विधिमंडळ पक्षनेतेपद जे अजित पवारांकडे होतं ते देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे. सुनेत्राताईंकडे पद द्यावं अशी अनेकांची मागणी आहे आणि ते चूक आहे असं वाटत नाही. पण निर्णय बैठकीत होईल, असं छगन भुजबळ यांनी सांगितलं आहे.

अजित पवार राष्ट्रवादीसंदर्भातील कामांवर आम्ही लक्ष देत आहोत असं सांगताना त्यांनी आपल्याला १४ बैठका झाल्याची काही कल्पना नसल्याचं म्हटलं. ते म्हणाले, उपमुख्यमंत्रीपदाची जागा रिकामी आहे ती, सुनेत्रा वहिनींच्या माध्यमातून कशी भरता येईल याकडे लक्ष आहे. पक्ष ठरवेल त्याप्रमाणे निर्णय होईल. उद्या विधिमंडळ पक्षनेता ठरवला जाईल आणि कदाचित एकमत झालं आणि प्रक्रिया झाली तर उद्याच शपथविधीही होऊ शकतो. शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार या बैठकीला उपस्थित असतील. या बैठकीत सूनेत्रा पवारांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाण्याची शक्यता आहे. तसं झाल्यास पक्षाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवडीचे पत्र दिले जाणार आहे. ही निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रीपदाचा शपथविधी पार पडण्याची शक्यता आहे. या शपथविधीसाठी कोणतीही जय्यत तयारी केली जाणार नाही, अत्यंत साधेपणाने तो पार पडेल. या शपथविधीनंतर सूनेत्रा पवारांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश होईल. यासह राज्याला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मिळतील

## २८ जानेवारीला....

Universal Time (UTC) ही कालमापन पद्धत वापरते. ते भारतीय प्रमाणवेळेपेक्षा (खडढ) सुमारे ५.५ तास मागे आहे. त्यामुळे स्थानिक वेळेनुसार पाहिल्यास विकिपीडियावरील माहिती आधी अपलोड केली आहे असे वाटू शकते. तसेच, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या अनेक स्क्रीनशॉट्स ब्राउझरमधील "inspect element' साधनांचा वापर करून त्याची वेळ बदलून तयार करण्यात आले असून, त्याद्वारे चुकीची माहिती पसरवली जात आहे.

## परळीत लॉज...

तसेच डमी ग्राहक व दोन शासकीय पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १५०० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या पुरुषाला त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव नाशर नशीर शेख असे सांगितले. सदर पुरुषाची पंचासमक्ष झडती घेतली असता, डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या

◆ पान ९ वरून पुढे...

३ नोटा मिळून आल्याने त्या पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या . त्यापैकी डमी ग्राहकासोबत रूम मधे मिळून आलेल्या पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी केली असता , तीने सांगितले की, ती भिवंडी ठाणे ची असून दत्ता अंतराम मुंडे याने मला फोन करून इथे बोलवून घेतले आहे. तसेच दुसरी महिला पुणे येथून आली आहे. प्रत्येक ग्राहकाकडून १५०० रू घेतात व त्यापैकी आम्हाला ५०० रु देतात. एजंट नाशर नशीर शेख व मॅनेजर सोमनाथ ज्ञानोबा मुंडे रा. टोकवाडी तसेच दत्ता अन्तराम मुंडे रा. कन्हेरवाडी ता. परळी जि बीड पीडीत महिलांना बोलवून घेतात व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. तसेच रुमची झडती घेतली असता ६ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. नमुद आरोपी , पीडीत महिलेस स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ ,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे अंबाजोगाई उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मझहरअली सय्यद , सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद मेंडके पोठा परळी ग्रामीण, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव, अंकुश निमोने, महीला पोलीस हवालदार उषा चौरे, पोलीस हवालदार अशोक शिंदे, राजेंद्र मिसाळ, नवनाथ हारगावकर, रमेश तोटेवाड, तुळशीराम परतवाड, रावसाहेब मुंडे, विठ्ठल परजणे, पोलीस शिपाई योगेश निर्धार, महादेव केदार, सर्व नेमणूक पोठा परळी ग्रामीण व अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

## बारामती विमान....

अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारीला सकाळी पावणे नऊच्या सुमारास अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. फ्लाईट अटेंडंट असलेल्या पिंकी माळी यांच्यासाठी हा प्रवास अखेरचा ठरला. ३० वर्षीय पिंकी माळी यांच्या पार्थिवावर गुरुवारी मुंबईतील शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आले. या अपघाताची सखोल चौकशी करण्याची मागणी पिंकी माळी यांचे वडील शिवकुमार यांना केली. लेकीच्या अकाली निधनानं शिवकुमार यांना मोठा धक्का बसला आहे. त्यातच त्यांना लेकीच्या कंपनीकडून अतिशय वाईट अनुभव आला आहे. पिंकी माळी या व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीत कार्यरत होत्या. 'आमची मुलगी काम करत असलेल्या कंपनीनं आम्हाला अपघाताची माहिती दिलीच नाही. त्यांनी आम्हाला अपघाताबद्दल काहीच सांगितलं नाही. टीव्हीवरील बातम्यांमधून आम्हाला तिच्या निधनाबद्दल समजलं,' असं शिवकुमार यांनी सांगितलं. 'आम्ही बारामतीला लेकीचं पार्थिव आणायला गेलो. तिथेही कंपनीचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी नव्हता. समन्वयासाठी कोणीही नव्हतं. मी माझ्या मित्रांसोबत बारामतीला

◆ पान ९ वरून पुढे...

गेलो आणि माझ्या लेकीचं पार्थिव घेऊन आलो. सरकारनं या अपघाताची सखोल चौकशी करावी', अशी आग्रही मागणी शिवकुमार यांनी केली.

पिंकी माळी यांच्या पार्थिवावर गुरुवारी अंत्यसंस्कार झाले. त्यांचे पती सोमविकर सैनी यांनी पार्थिवाला मुखाग्नी दिला. कंपनी किंवा सरकारकडून कोणतीही मदत मिळाली नसल्याचं सैनी यांनी सांगितलं. 'आमच्याशी कोणीही संपर्क साधलेला नाही. कंपनी असो वा सरकार, कोणीही आमच्याशी बोललेलं नाही. आतापर्यंत मला कंपनीनं साधा कॉलही केलेला नाही. किमान एक कॉल करण्याचं सौजन्य तरी दाखवायला हवं होतं. कुटुंबावर इतकं संकट कोसळलंय, त्यांची अवस्था काय आहे, हे तरी विचारायला हवं होतं,' अशा भावना पिंकी यांच्या पतीनं व्यक्त केल्या.

## अजित दादा...

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख उद्धव मडके, भाजपाचे समन्वयक श्रीकांत सानप, रिपाईचे तालूकाध्यक्ष किशोर कांडेकर, कॉंग्रेसचे महेश बेदरे, शरद पवार गटाचे राजेंद्र मोटे, सामाजिक कार्यकर्ते गजानन काळे, सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, सावता परिषदेचे दादासाहेब चौधरी, महेश दाभाडे, भाजपचे सचिन दाभाडे, राजेश पवार, राजेंद्र बेदरे, विठ्ठलराव शेळके, शेख खाजा, शितल धोंडरे यांसह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण म्हणाले की, अजित दादा कार्यकर्त्यांची काळजी घेणारे नेते होते, विकासकामावर त्यांचे बारीक लक्ष होते. आ. विजयसिंहना त्यांचे सतत मार्गदर्शन होते. कामाचा झपाटा असणारा नेता गेला, त्यांनी केलेला संकल्प आपल्याला पुर्ण करावयाचा आहे. दादांची स्वप्न पुर्ती हीच त्यांना आदरांजली असेल असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी भावनिक होऊन बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, नियती कठोर आणि निर्दयी असते. दादांच्या अपघाताने होत्याचे नव्हते झाले, अजितदादा कर्तृत्ववान होते. लोकांच्या मनातील नेते होते. जाती पातीचा विचार त्यांनी केला नाही, असा नेता आपला पालकमंत्री व्हावा हे आपल्या जिल्ह्याचे भाग्य होते. सगळे चालीजुपीला लागले असताना असे घडणे आम्हला उद्ध्वस्त करुन गेले आहे. अजितदादांकडून शिस्त आणि वक्तशीरपणा आम्ही शिकलो. त्यांना श्रद्धांजलीसाठी शोकसभा घ्यावी असे कधीच वाटले नाही. शेवटच्या घटकाची नोंद करणारे अजितदादा होते. सामान्य लोकांसाठी त्यांचे जाणे दुर्दैवी आहे. दादांना कुणीही विसरणारा नाही. दादा हे या शतकातले जननायक होते असेही ते यावेळी म्हणाले. आपल्या भावना व्यक्त करताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, ही घटना मनाला चटका लावणारी आहे. आज दादा आपल्यात नाहीत हे मनाला पटत नाही. राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या आमच्या सारख्या कार्यकर्त्यांवर हा मोठा आघात आहे. अतिशय कमी कालावधीत त्यांनी जे केले ते विचार करण्याच्या पलिकडे आहे. अनेक विकासकामे दिली. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून मोठे नियोजन त्यांनी केले होते. यावेळी शोकसभेत बोलताना भाऊसाहेब

◆ पान ९ वरून पुढे...

नाटकर म्हणाले की, दादांचे जाणे आपल्यासाठी दुर्भाग्य आहे, असा नेता पुन्हा होणार नाही. शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख उद्धव मडके म्हणाले की, बीड जिल्ह्याला वरदान ठरलेले दादा आता आपल्यात नाहीत हे अतिशय वेदनादायक आहे. आज त्यांच्याबद्द बोलताना शब्द फुटत नाहीत. रिपाईचे तालूकाध्यक्ष किशोर कांडेकर म्हणाले की, दादांचे जाणे सर्वांना वेदना देऊन गेले आहे. ही वेदना सांगण्या पलीकडची आहे. मानवी हक्क अभियानाचे कडुदास कांबळे म्हणाले, अजितदादा हे खुप मोठे व्यक्तीमत्व होते, त्यांच्या जाण्याने खुप मोठी पोकळी निर्माण झाली आहे. भाजपाचे समन्वयक श्रीकांत सानप म्हणाले की, अजितदादा यांच्या तोडीचा राज्यात नेता नव्हता, आपला जिल्हा विकासाला मुकला. कॉग्रेसचे महेश बेदरे म्हणाले की, अजितदादाच्या रुपाने एक धाडसी व करारी नेतृत्व हरपले. बीड जिल्ह्याचे हे दुर्दैव. विकासाचे नेतृत्व त्यांच्या माध्यमातून मिळाले होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे राजेंद्र मोटे म्हणाले की, महाराष्ट्र एका गुणी नेतृत्वाला मुकला. त्यांच्या अकाली निधनानंतर बीड जिल्हा आणि महाराष्ट्र मागे जाणार आहे. अजितदादा हे रिफ्लेसमेंन्टचा विषय नाही, त्यांच्या आदर्शावर आपण चालू हीच त्यांना आदरांजली आहे. गणेश सावंत म्हणाले की, दादा हे राजा मनाचे माणूस होते. दादा कळायला दादांना मरावे लागले. आपण या पुढील काळात काम करुन दादांना आदरांजली आणि दादांचा संकल्प आपण पुर्ण करु. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गजानन काळे, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी पवार, सौ. शितलताई धोंडरे, गेवराई नगर परिषदेचे गटनेते शेख खाजामामू यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी ऋषिकेश बेदरे, बीड बाजार समितीचे उप सभापती शामराव पडुळे, प्रकाश सुरवसे, परमेश्वर वाघमोडे यांच्यासह सर्वपक्षिय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच अजित दादा पवार यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस....


उपमुख्यमंत्री म्हणून बीड जिल्ह्याच्या पालकत्वाची जबाबदारी स्वीकारून त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. कठोर शिस्त, कामाला सर्वोच्च प्राधान्य, पारदर्शकता आणि स्वच्छतेची जाणीव हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते. सामान्य कार्यकर्त्याला ताकद देणारा, आत्मविश्वास देणारा नेता म्हणून ते कायम स्मरणात राहतील. त्यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्याने एक सक्षम नेतृत्व गमावले असून ही पोकळी कधीही भरून निघणारी नाही. अशी भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी, कार्यकर्ते दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केजचा माजी...

या बनावट नोटा त्यांना कोणी पुरवल्या? या रॅकेटचे मुख्य सूत्रधार कोण आहेत? आणि तामिळनाडूमध्ये त्यांना कोणी आश्रय दिला होता? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आता गुप्त वार्ता विभाग आणि गुन्हे अन्वेषण विभाग सक्रिय झाला आहे. या घटनेमुळे केज तालुक्यासह बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महात्मा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये सत्य,अहिंसा आणि सत्याग्रहाचे उपासक महात्मा गांधी यांना पुण्यतिथी आणि हुतात्मादिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला. याप्रसंगी महात्मा गांधी यांना अभिवादन सकाळी ठीक ११.२ मि. वाजता करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक विजय देशमुख, डब्ल्यू.एस.वाघमारे, आर.बी. घुले, श्रीमती एन.जी.मुंडे, पवळ यु.बी., संतोष मेश्राम हे शिक्षक आणि एल.बी. हजारे,एस.एस. गायकवाड, भारत कोळेकर, एन.पी. गायकवाड हे शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी कार्यालयात श्रद्धांजली

### ‘वेळेचं महत्त्व जाणणारा नेता’...:जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितली दिवंगत नेत्याची थोरवी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रशासनाची जाण असणारे नेते होते. वक्तशीरपणा हा त्यांच्या ठायी होता. वेळेचं महत्त्व जाणणारा एक मोठा नेता आपल्यातून निघून गेला, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आज जिल्हाधिकारी कार्यालयात श्रद्धांजली अर्पण केली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

अजित पवार यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी स्वामी यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर बोलतांना जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, प्रशासनाची जाण असणारा एक मोठा नेता म्हणून अजितदादा सगळ्यांच्या स्मरणात राहतील. समाजातील सर्व थरातील लोकांशी त्यांचा थेट संपर्क होता. प्रश्नांची जाण असणे, ते सोडविण्यासाठी अथक परिश्रम करण्याची तयारी असणे हे त्यांचे महत्त्वाचे गुण होते. वक्तशीरपणा हा त्यांच्या ठायी होता. वेळेचं महत्त्व जाणणारा नेता आपण गमावला आहे, अशा शब्दात जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिवंगत नेत्याची थोरवी सांगितली.

निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी- कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रीडा क्षेत्राचा आधारस्तंभ हरपला : राजर्षी शाहू कन्या विद्यालयात अजितदादा पवार यांना श्रद्धांजली



**बीड । प्रतिनिधी**

राजर्षी शाहू कन्या विद्यालयात दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी तसेच विद्यालयातील सहशिक्षक श्री. एस. सी. जगताप यांनी आपल्या मनोगतातून अजितदादा पवार यांच्या सामाजिक, राजकीय व लोकहितकारी कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी क्रीडा क्षेत्राचा आधारस्तंभ गेला असून क्रीडाक्षेत्र पोरके झाले आहेअशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत अजितदादा पवार यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी.कदम, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. टी. राऊत तसेच राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे उपस्थित होते. या श्रद्धांजली कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## अमृत कौशल्य उद्यम प्रशिक्षण योजनेंतर्गत मोफत प्रशिक्षणासाठी नावनोंदणी सुरू

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्य शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी विविध मोफत व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अमृत कौशल्य उद्यम प्रशिक्षण योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे विविध प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी नावनोंदणी सुरू करण्यात आली आहे. लक्षित गटातील युवक व युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा व्यवस्थापक अक्षय लंबे यांनी केले आहे. या प्रशिक्षण योजनांमधून प्रशिक्षणार्थ्यांना स्वयंरोजगार सुरू करण्यास तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या योजनेअंतर्गत अमृत उद्योग कौशल्यवर्धन, अमृत सूर्य मित्र, सोलार इन्स्टॉलेशन टेक्निशियन, अमृत आरीवर्क, अमृत ग्लॅमर (ब्युटी पार्लर), अमृत बेकरी तसेच अमृत आयात-निर्यात प्रशिक्षण असे विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून, हे सर्व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णतः मोफत आहेत. अमृत संस्था ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था असून, खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना इतर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळांच्या योजनांचा लाभ मिळत नाही, अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक हा अमृत संस्थेचा लक्षित गट आहे. यामध्ये ब्राह्मण, कोमटी, मारवाडी, ठाकूर, गुजराती, सिंधी, कायस्थ, जाट, बणिया, बंत्स, नायर, अय्यंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, येलमार, त्यागी, सेनगुनथर, राजपुरोहित, नायडू, भूमिहार, हिंदू नेपाळी, कानबी, एलमार आदी जातींचा समावेश आहे. या जातींमधील वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेले नागरिक अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेऊ शकतात. इच्छुक उमेदवारांनी वेळ न दवडता अमृत कार्यालयाशी संपर्क साधून या प्रशिक्षण योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती व नावनोंदणीसाठी अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालय पत्ता : विभागीय व जिल्हा कार्यालय, अमृत, पुंडलिक नगर रोड, सेक्टर-४, सिडको, हनुमान नगर पाण्याच्या टाकीजवळ, छत्रपती संभाजीनगर - ४३१००९

## शासनमान्य ग्रंथ निवड यादीसाठी ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी ’ ग्रंथभेट ’ योजने अंतर्गत सन २०२५या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात. या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथाची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या ‘शासनमान्य ग्रंथ निवड यादी’ मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ या कॅलेंडर वर्षात ( दि. १ जानेवारी २०२५ ते दि.३१ डिसेंबर २०२५) प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत (Complimentary copy) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही. तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयाकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथासोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. सर्व लेखक, प्रकाशक यांनी ग्रंथ पाठवावे असे आवाहन ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

# चौसाळा कॉलेज प्रीमियर लीग वर्ष १ ले.चा प्रथम विजेता संघ : फाईव सेव्हन स्टार नेकनूर

**बीड । प्रतिनिधी**

कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित चौसाळा कॉलेजप्रीमियर लीग ( सी.सी. पी.एल.) टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. २१ ते २५ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व त्यांच्याच मार्गदर्शनानुसार या स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे, माजी सभापती काकासाहेब जोगदंड , मा.श्री. मोहनराव झोडगे,मा.श्री.रमेश कळासे ,डॉ. वैभव मोटे, मा. श्री.राजेश तांगडे,मा. श्री. रविंद्र मच्छीद्र, मा.श्री.अशोक शिंदे, या मान्यवराच्या हस्ते बक्षीस वितरण



करण्यात आले.या चौसाळा कॉलेज प्रीमियर लीग (सी.सी.पी. एल.) मध्ये एकूण सोळा संघांनी सहभाग नोंदवला होता.

उपांत्य फेरी आणि अंतिम सामना हा रविवार दि.२५ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाला.या उपांत्य फेरीमध्ये के.सी.सी. क्रिकेट क्लब खर्डा, चंदन क्रिकेट क्लब चौसाळा, फाईव सेव्हन स्टार क्रिकेट क्लब नेकनूर आणि पाटील इलेव्हन चौसाळा या चार संघांनी प्रवेश केला. उपांत्य फेरीमध्ये पहिला सामना चंदन क्रिकेट क्लब चौसाळा विरुद्ध फाईव सेव्हन स्टार क्रिकेट क्लब नेकनूर या दोन संघा दरम्यान झाला.हा सामना फाईव सेव्हन स्टार क्रिकेट क्लब नेकनूर संघाने मोठ्या फरकाने जिंकला.

दुसरा उपांत्य फेरीचा सामना के.सी.सी. क्रिकेट क्लब खर्डा विरुद्ध पाटील इलेव्हन चौसाळा यांच्या दरम्यान झाला. या सामन्यामध्ये पाटील इलेव्हन चौसाळा संघाने विजय मिळवला. अंतिम सामना पाटील इलेव्हन चौसाळा विरुद्ध फाईव सेव्हन स्टार क्रिकेट क्लब नेकनूर यांच्या दरम्यान झाला. यामध्ये अंतिम सामना फाईव सेव्हन स्टार नेकनूर संघाने विजय मिळवला. .या विजेत्या संघाला प्रथम बक्षीस २१०००/- रु. ट्रॉफी व प्रमाणपत्र मेडल देऊन गौरविण्यात आले. द्वितीय बक्षीस १५०००/- रु.ट्रॉफी प्रमाणपत्र पाटील इलेव्हन चौसाळा, तृतीय बक्षीस ११०००/- ट्रॉफी प्रमाणपत्र, चंदन क्रिकेट क्लब चौसाळा, चतुर्थ बक्षीस ७०००/-रु. ट्रॉफी प्रमाणपत्र या संघांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या स्पर्धेमध्ये नेकनूर संघाचा शेख अरफात याने एकूण १९५ धावा काढल्या. त्याला उत्कृष्ट फलंदाज म्हणून २५००/- रु.व ट्रॉफी तर गोलंदाज नेकनूर संघाचा अफसर उल्ला याने एकूण ११ विकेट घेतल्या बद्दल उत्कृष्ट गोलंदाज म्हणून २५००/- रु.व ट्रॉफी अयाज शेख याने एकूण ७ झेल घेतल्याबद्दल त्याला उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून २५००/- रु.व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेला पंच म्हणून श्री. अमोल चव्हाण, श्री. अरबाज मुलाना , श्री.वैभव सोनवणे, श्री.नोव्हीद सय्यद यांनी काम पहिले.या लीगमधील सर्व सामन्यांचे समालोचन (कॉमेंट्री) करण्यासाठी इंग्रजीमध्ये डॉ. कुशाबा साळुंके, मराठीमध्ये डॉ. सुधाकर वणवे, आणि हिंदी मध्ये डॉ. सय्यद शानूर यांनी योगदान दिले.

नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार या पुढेही अशा प्रकारची स्पर्धा घेण्यात येणार असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे म्हणाले या परिसरात खेळाचे वातावरण निर्माण होण्यासाठी सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय कदम यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा. सुधीर माने यांनी केले. शेवटी आभार प्रा. डॉ. सय्यद शानूर यांनी व्यक्त केले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. संजय कदम , शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा. डॉ. सय्यद शानूर, प्रा. डॉ. सुधाकर वणवे, प्रा. गणपती ढवळशंख, प्रा. डॉ. विलास भिल्लारे, प्रा.डॉ. पंढरीनाथ हिरवे, प्रा. डॉ. कुशाबा साळुंके, प्रा. डॉ. प्रशांत साबळे, प्रा. विकास शिंदे, प्रा. सुधीर तेलप, प्रा.ओम चाळक, प्रा. लहू शेळके,यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक , क्रीडा प्रेमी तरुण, खेळाडू व विध्यार्थी उपस्थित होते.

## शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा व कायदेविषयक महाशिबीराचे गंगाखेडाला १४ फेब्रुवारी रोजी आयोजन

**परभणी । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती ,गंगाखेड तसेच जिल्हा प्रशासन यांच्यावतीने दि. १४ फेब्रुवारी, रोजी सकाळी ११ वाजता कापसे मंगल कार्यालय परळी रोड, गंगाखेड येथे विधी सेवा महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या महावेळाव्याचा मुख्य विषय ज्येष्ठ नागरिकंसाठीच्या योजना व वैद्यकीय तपासणी असून त्या व्यतिरिक्त समाजातील दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करणे तसेच त्याचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करणे हा शिबिराचा उद्देश आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत त्यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांबाबतही माहिती व लाभ देण्याकरीता महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे आणि न्यायमुर्ती संजय ए. देशमुख, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायाधीश, परभणी जिल्हा यांच्या हस्ते महाशिबीराचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नितीशा माथुर याच्या उपस्थितीमध्ये हे महाशिबीर होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी महाशिबीराला उपस्थित राहून शासकीय योजनांबाबत माहिती करुन घ्यावी व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भुषण काळे आणि गंगाखेड वकील संघाचे अध्यक्ष मिलिंद क्षिरसागर यांनी केले आहे.

## हुतात्मा दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात मौन पाळून आदरांजली

**परभणी । प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आज जिल्हाधिकारी कार्यालयात दोन मिनीटे मौन पाळून आदरांजली वाहण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते ११ वा. २ मि. या कालावधीत उपस्थित सर्व अधिकारी- कर्मचारी यांनी मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. निवासी



उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, पुरवठा अधिकारी विलास मुसळे, नायबतहसिलदार प्रशांत वाकोडकर, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### आदर्श मार्केट व्यापारी असोसिएशनच्यावतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली

## महाराष्ट्र राज्यासह बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान: प्रकाश कानगांवकर

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांचे विमान अपघातामध्ये दुःखद निधन झाल्याची बातमी समजताच बीडच्या आदर्श व्यापारी असोसिएशनने सर्व बाजारपेठ बंद केली. असोसिएशनच्यावतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. या श्रध्दांजली सभेत असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश कानगावकर म्हणाले की, अजितदादांच्या अशा अकाली निधनाने महाराष्ट्रासह बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे. राजकारण करत असतांना दादांनी कधीही कोणाचे मन दुखावलेले नाही. व्यापारी वर्गाचे प्रश्न दादांनी अगदी बारकाईने सोडवलेले आहेत. दादा हे व्यापार्यांचे हित जोपासणारे नेतृत्व होते. दादांच्या अशा जाण्याने व्यापारी वर्गाचे मोठे



नुकसान झाले आहे. असेही आदर्श मार्केट व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी श्रध्दांजली सभेस असोसिएशनचे सचिव सुदाम चव्हाण, महेबुब शेख, सुभाष उगले, गणेश मुळे, विशाल मानकुस, आप्पा औताडे, अरुण देवधरे, मच्छिंद्र उपरे, सिध्देश्वर किवणे, मंगेश काळे, गणेश मानकुस, अमोल पतंगे, देवीदास मसुरे, निलेश पतंगे, राजु फुटाणे, राम शिंदे, विनायक पतंगे, दत्ता जगताप, शिवाजी शिंदे, दिपक पतंगे, गणेश उपरे, राहुल शिंदे, गणेश राऊत, ज्ञानेश्वर पंधारे, विनायक दुबाले, किरण वाघमारे, नारायण मानकुस, निलेश पतंगे, दत्ता उबे, बंटी कानगावकर, गणेश सुत्रे, देविदास मसुरे, लाला कानगावकर, आप्पा नरे, देविदास नेरे, दिपक घाडगे, अक्षय कानगावकर, कैलास उपरे, रियाजभाई, समीर अन्सारी, इम्रान भाई, बाबु भाई, चाऊस, आबुजर पटेल, कादरभाई, दीपक खरात, हेंद्रे मामा, बाहेकर, अमित मौजकर, समसाद पटेल, सोमेश्वर कानगावकर यांच्यासह आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे सर्व पदाधिकारी, व्यापार्यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ •

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गोविंद म. नाईकवाडे यांचे रविवार रोजी कीर्तन



बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील सहाव्या पुण्यतिथी माघ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. रामायणाचार्य गोविंद महाराज नाईकवाडे खेर्डा यांचे रविवार दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी मन्यारवाडी ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## स्व.अजित दादांना आज श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन ; उपस्थित रहा – नाईकवाडे , पटेल

बीड । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री सर्वांचे लाडके नेते दिवंगत अजित दादांना आज दिनांक ३१-०१-२०२६ शनिवार रोजी रामकृष्ण लॉन्स येथे सायंकाळी ६:०० वाजता बीड शहरवासीयांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी या शोकसभा कार्यक्रमाला दादांच्या सर्वपक्षीय चाहत्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी पक्षाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक अमर नाईकवाडे, नगरपरिषदेचे गटनेते फारुक पटेल यांनी केले आहे. उपमुख्यमंत्री अजित दादाच्या अपघाती निधनाने सर्व समाज मन हेलावून गेले आहे. बीड जिल्ह्याचे पालकत्व निभावताना अजित दादांनी जिल्ह्याच्या विकासासाठी सढळ हाताने मदत केली. त्यांचे असे अकाली जाणे वेदना देणारे ठरले आहे, सपूर्ण बीड जिल्हा शोकमय झाला आहे. आपल्या आवडत्या नेत्याला आज सायंकाळी रामकृष्ण लॉन्स मध्ये सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. या शोक सभेसाठी शहर वासियानी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नगरसेवक तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे , गटनेते फारुक पटेल यांनी केले आहे.

# सर्वांना बरोबर घेऊन जाणारे नेतृत्व हरपले

## जगातील सर्वात आज्ञाधारक पुतण्या अजितदादा : आ. सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याच्या विकासात मोलाची भूमिका बजावणाऱ्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजित पवार यांच्या निधनाने बीड जिल्हा पोरका झाला आहे. विकासाच्या बाबतीत त्यांनी कधीही राजकारण केले नाही. सर्वांना बरोबर घेऊन सर्वांची काळजी करणारे नेतृत्व हरपले आहे अजित दादांनी आपणाकडे आलेले काम कोणत्या पक्षाचे आहे याबाबत विकास कामांमध्ये त्यांनी कधीही पक्ष भेद केला नाही जी कामे होण्यासारखे आहेत ती त्यांनी तात्काळ मंजूर केली आहेत आणि जे होणार नाहीत तात्काळ होणार नाही स्पष्ट आणि कणखर नेता म्हणजे अजित पवार होते असे प्रतिपादन



आमदार सुरेश धस यांनी केले.

आष्टी येथील पंचायत समिती कार्यालयात शुक्रवार, दि. ३० रोजी दुपारी ३ वाजता स्व. अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की अजित दादा हे जगातील सर्वात आज्ञाधारक पुतण्या आहेत कारण दोन वेळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पद मिळण्याची संधी भारी असताना केवळ काकांचा आदेश म्हणून त्यांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारले हा त्यांच्या मनाचा मोठेपणाच होता असे सांगितले यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार साहेबराव दरेकर सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे सतीश शिंदे संजय मेहेर सुखलाल मुथा उपस्थित होते त्याचबरोबर सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की, सन २००८ मध्ये आष्टी तालुक्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या खुंटेफळ साठवण तलावाला स्व. अजित पवार यांनी मंजुरी दिली. सन १९९५ पासून त्यांच्या सोबत काम करण्याची संधी मिळाली. सन २००३ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला असताना, राज्यातील सर्वात मोठी छावणी मी चालवली होती. त्या छावणीसाठी सर्वाधिक मदत स्व. अजित दादांनी दिली. अजितदादांच्या निधनामुळे केवळ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचेच नव्हे तर महाराष्ट्रातील जनतेचे नुकसान झाले आहे असे सांगत विकासाच्या प्रश्नावर त्यांनी कधीही राजकारण केले नाही, हे त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य होते.

माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, स्व. अजित दादांची काम करण्याची पद्धत राजकारणासह सामान्य जनतेलाही चांगलीच परिचित होती. ते उत्तम राजकारणी तर होतेच, पण मनाने शेतीनिष्ठ शेतकरीही होते. एवढा मोठा व्याप आणि जबाबदाऱ्या असूनही ते दररोज सकाळी ८ वाजता फोन करून शेतीविषयक माहिती घेत असत. त्यांच्या जाण्याने बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे.

माजी आमदार साहेबराव दरेकर म्हणाले की, स्व. अजित दादा एकदा दिलेला शब्द कधीही मागे घेत नसत. जे बोललो ते बोललो या त्यांच्या ठाम स्वभावामुळे ते सर्वांनाच आपलेसे वाटत. त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहतील.

माजी आमदार बाळासाहेब आजबे ▶▶ उर्वरित पान २ वर



स्व. अजित दादा पवार यांना पिंपळनेर सर्कलच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करताना सर्व पक्षीय नेते पिंपळनेर सर्कल चे सर्व सहकारी उपस्थित होते.

## बीड बाजार समितीत करोडोंची अफरातफर बोगस कामे दाखवून बिले उचलण्याचा प्रकार

बीड । प्रतिनिधी

येथील कृषि उत्पन्न बाजार समितीत मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरु आहे. कोणाचंच कोणावर नियंत्रण राहिलेलं नाही. जो तो मनाला वाटेल तसे वागू लागला आहे. निवडणुकीसाठी बाजार समितीचे गोडावून वापरण्यात आले होते. या गोडावूनच्या भाड्यापोटी जिल्हा प्रशासनाकडून बाजार समितीला २ कोटी २० लाख रुपये आलेले आहेत. सदरील रक्कम कर्मचाऱ्यांसह इतर बाबींवर खर्च करण्याऐवजी त्या पैशातून रेशीम शेड उभारणे, चौसाळा मार्केटसाठी गाळे करणे असे प्रकार सुरु आहेत. कांदा मार्केट नसुनही त्या ठिकाणी गाळे काढून ते जवळच्या नातेवाईकांना ▶▶ उर्वरित पान २ वर

### संचालक गप्प का आहेत ?

बीड कृषि उत्पन्न बाजार समिती मोठी आहे. या ठिकाणी योग्य पद्धतीने कारभार झाल्यास सर्व काही सुरळीत होऊ शकते. कर्मचाऱ्यांना सुद्धा वेळेवर आणि नियमीत वेतन मिळेल परंतु काही संचालकांनी बाजार समिती म्हणजे आपल्या स्वत:च्या उत्पन्नाचे साधन आहे असेच समजले आहे की काय ? असा प्रश्न सध्याचा कारभार पाहून उपस्थित होऊ लागला आहे. बाजार समितीत एवढे सगळे संचालक असतांनाही या सर्व प्रकरणावर कोणी का बोलत नाही ? काही संचालक सोयीनुसार रहात असले तरी अशा कारभारावर कुणीतरी बोलायला हवं अशी मागणी होऊ लागली आहे.

## स्व. अजित दादांना भाजपा कार्यालयात श्रद्धांजली अर्पण

बीड । प्रतिनिधी

राज्याचे उप मुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजित दादा पवार यांच्या दु:खद अपघाती निधनाने संपूर्ण राज्यभर हळहळ व्यक्त केली जात आहे. आयुष्यभर लोककल्याणाची कामे करणारे, सर्वांना हसवणारे दादा महाराष्ट्राला रडवून गेले. भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हा कार्यालयात प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख, नवनिर्वाचित नगरसेवक एडवोकेट गोविंद भैया शिराळे, लोकशाही पत्रकार संघाचे भागवत वैद्य, ॲड. काचमांडे, राजूभाऊ महावाले, राजू शहाणे, बालाजी पवार, मुळे, केदार मॅडम उपस्थित होते.



## जय भवानी महाविद्यालयात स्वर्गीय ना.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दाजंली

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथिल जयभवानी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला.स्वर्गीय अजितदादा पवार यांना महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा घेऊन दोन मिनिटे मौन पाळुन त्यांना श्रध्दाजंली वाहण्यात आली.या प्रसंगी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी स्वर्गीय अजित दादा यांच्या अकाली ▶▶ उर्वरित पान २ वर



## वाराणसीतील मणिकर्णिका घाटाची तोडफोड करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा ऐतिहासिक , सांस्कृतिक वारसा नामशेष करण्याचा प्रयत्नांच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन

लिंबागणेश । प्रतिनिधी

उत्तरप्रदेशातील वाराणसी येथील जगप्रसिद्ध मणिकर्णिका घाटावर सुरू असलेल्या पुनर्विकास कामाच्या नावाखाली ऐतिहासिक मूर्ती व शिवलिंगांची तोडफोड करण्यात आल्याचे प्रकार सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून समोर आले आहेत. संपूर्ण भारतात सांस्कृतिक पुनरुत्थानाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



यांनी उभारलेल्या ऐतिहासिक संरचनांचे झालेले नुकसान हा केवळ बांधकामाचा प्रश्न नसून तो धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशावर झालेला घाला असल्याचे मत व्यक्त होत आहे.


या घटनेच्या निषेधार्थ मंगळवार (दि. २७) रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौक, लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. रविंद्र निर्मळ, कृष्णा पितळे यांची समयोचित भाषणे झाली.निवेदन मंडळ अधिकारी उज्वला राऊत, तलाठी गणपत पोतदार, सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड,पोह.अविनाश घुंगरट,पोह. गणेश परजने यांनी स्विकारले. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, अँड . गणेश वाणी, दामोदर थोरात, समीर शेख, ▶▶ उर्वरित पान २ वर

## आज मूकनायक दिन समारंभास उपस्थित रहावे : वैभव स्वामी

### जिल्ह्याचे पालकमंत्री महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन

बीड । प्रतिनिधी

वंचित, शोषित, पीडित, सामान्य घटकांचा आवाज होण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १०६ वर्षापूर्वी मूकनायक हे पहिले वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पत्रकार संघाच्या वतीने ज्येष्ठ समाजसेवक डी जी वानखेडे यांना मूकनायक २०२६ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमापूर्वी बीड जिल्ह्याचे





पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना अभिवादन करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला सर्व पत्रकार आणि आंबेडकर प्रेमी व अजित दादा पवार यांच्यावर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

बीड येथील तुलसी संगणक कॉलेज सभागृह, आदर्श नगर,डीपी रोड, बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप व महामानव सार्वजनिक वाचनालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ जानेवारी रोजी मूकनायक दिन समारंभ सायंकाळी ५ वाजता ▶▶ उर्वरित पान २ वर

## संस्कारची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



बीड । प्रतिनिधी

येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली/दुसरी विभागाची शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली. या सहलीत संस्कारांच्या चिमुकल्यांनी विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट देऊन मनमुराद आनंद लुटला . या सहलीत विद्यार्थ्यांनी संभाजीनगर येथील सिद्धार्थ गार्डन , वेरूळ येथील कैलास लेणी व घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. सिद्धार्थ गार्डन मधील विविध प्राणी , मत्स्यालय, पाहताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण आनंद खेळत होता. तसेच गार्डनमधील विविध खेळण्यांसोबत खेळताना, रेल्वेत बसताना विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला . बागेतील स्नेह भोजन अतिशय अविस्मरणीय ठरले. कैलास लेणी व घृष्णेश्वर मंदिर पाहताना विद्यार्थी ▶▶ उर्वरित पान २ वर

## आदित्य पॉलीटेक्निकच्या दोन विद्यार्थींची भारतीय नौदलात निवड

### योग्य दिशा, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि संस्थेच्या सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचे उज्वल करिअर घडते: डॉ. आदित्य सारडा

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थांना पुस्तकी ज्ञानाबरोबर विविध करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. योग्य दिशा, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि संस्थेच्या सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल करिअर घडते, असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले. आदित्य पॉलीटेक्निकच्या दोन विद्यार्थ्यांची भारतीय नौदलात 'सेलर (डडठ)'



पदावर निवड झालेल्या विद्यर्थांचा सत्कार करतांना ते बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलीटेक्निक, बीड येथील दोन विद्यार्थ्यांनी भारतीय नौदलात 'सेलर (डडठ)' या प्रतिष्ठित पदावर निवड मिळवून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि मार्गदर्शनाची उंची पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा (२०२४ पासआऊट) मधील विद्यार्थी अनिकेत आसाराम राख तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थी सुबोध भागवत औटे (प्रवेश वर्ष २०२१-२०२४) यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर करिअरच्या विविध संधींबाबत योग्य दिशा देण्याचा संस्थेचा दृष्टिकोन या निवडीमागे महत्त्वाचा ठरला आहे. या निवडीबद्दल संस्थेच्या वतीने अनिकेत राख व सुबोध औटे यांचे ▶▶ उर्वरित पान २ वर